नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या लेख्यांचे स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून विहीत मुदतीत लेखापरीक्षण करुन घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- लोलेस-२०१८/प्र.क्र.११/नवि-३१

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १२ एप्रिल, २०१९.

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०७ (अ) मध्ये स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्यामार्फत लेखापरीक्षेची तरतूद विहीत केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १०२ ते १०४ मध्ये नगरपरिषदेचे लेखे त्यांची प्रसिध्दी व लेखापरीक्षा याबाबतची तरतूद विहीत करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील कलम १०४ नुसार मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील तरतूद सर्व नगरपरिषदांना लागू करण्यात आली आहे. सदर अधिनियमामधील तरतुदीनुसार त्यांचे लेखे लेखापरीक्षणासाठी स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडे प्रत्येक वर्षी सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, यानुसार विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून कालमर्यादेत करुन घेत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

२. यासंदर्भात विधानमंडळाच्या लोकलेखा समितीने केलेल्या **शिफारशीस अनुसरुन यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.**

१) महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १०४ मधील तरतुदीनुसार मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील तरतूद सर्व नगरपरिषदांच्या लेखापरीक्षणास लागू करण्यात आली आहे.

२) तसेच, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांचे लेखे दरवर्षी संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडे सादर करुन सदर लेख्यांचे लेखापरीक्षण करुन घेणे त्यांच्यावर बंधनकारक आहे.

३) राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी यासंदर्भात त्यांच्यास्तरावर आढावा घेऊन आतापर्यंतच्या ज्या वर्षांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्यामार्फत झालेले नसेल अशा सर्व वर्षांचे लेखे स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडे लेखापरीक्षणासाठी सादर करावेत. तसेच उपरोक्त अधिनियमामधील तरतुदींच्या अधीनतेने यापुढे प्रत्येक वर्षाचे लेखे लेखापरीक्षणासाठी स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडे विहीत कालमर्यादेत नियमितपणे सादर केले जातील याची दक्षता घ्यावी.

४) अधिनियमामधील तरतुदीनुसार संबंधित नागरी स्थानिक संस्थांचे लेखे लेखापरीक्षणासाठी स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडे विहीत कालावधीत नियमितपणे सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत यांची राहील. त्यांनी याबाबतची कार्यवाही विहीत कालावधीत पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी.

५) तसेच, संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लेख्यांची नियमित लेखापरीक्षण करण्याची कार्यवाही करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०४१२१७१०३४१९२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2019.04.12 17:37:07 +05'30'

(पां. जो. जाधव)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
४. विभागीय आयुक्त, (सर्व)
५. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व)
८. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व)
९. निवड नस्ती, (नवि-३१).